श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर.

'सन २०२३ - दैनंदिनी व दिनदर्शिका' छपाई कामाचे जाहीर दरपत्रक.

माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. नमूना दरपत्रक फॉर्म कार्यालयीन वेळेत श्री संत तुकाराम भवन येथे उपलब्ध होऊन मिळतील, तसेच www.vitthalrukminimandir.org या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. दरपत्रक फॉर्म स्वतंत्र लिफाफ्यात सिलबंद करून दि.----/----/२०२२ रोजी सायंकाळी ०५.०० वा. पर्यंत सादर करणे आवष्यक आहे. लिफाफ्यावर ठेकेदाराचे नांव व पूर्ण पत्ता आणि दरपत्रक 'सन २०२३ - दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करणेकामासाठी भरलेली आहे, असा सविस्तर तपशिल नमूद करावा.

२. दरपत्रक समक्ष श्री संत तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिष्टर पोष्टाने पाठवावे. उशिरा प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

३. अनामत रक्कम रू.५०००/- डीडी/रोख स्वरूपात भरणे आवश्यक आहे किंवा डीडी 'कार्यकारी अधिकारी, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर' यांचे नांवे काढावा.

४. छपाई कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | छपाई संख्या (नगामध्ये) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | दैनंदिनी<br>तपशिल - | |
| २ | दिनदर्शिका (भिंतीवरील)-<br>तपशिल - | |
| ३ | दिनदर्शिका (टेबलावरील)-<br>तपशिल - | |

५. मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या नमून्यांतच छपाई करणे आवश्यक आहे.

६. छपाई नमूना देणगी विभाग, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर येथे पहावयास मिळेल.

७. छपाई चांगल्या गुणवत्तेची असणे आवश्यक आहे.

८. छपाईमध्ये व त्यासाठी वापरण्यात आलेल्या कागदामध्ये अथवा बांधणीमध्ये दोष आढळून आलेस ठेकेदारास जबाबदार धरणेत येईल. प्रस्तुतकामी दुबारा छपाई करणेचे झालेस ती ठेकेदाराने स्वखर्चाने करून देणेची आहे.

९. छपाईची परवानगी असलेबाबत सर्व प्रकारच्या शासकीय परवान्याच्या प्रती निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१०. सदर मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकांस जबाबदार धरून मालाच्या किंमतीच्या ०५ टक्के पर्यंत दंड आकारण्यात येईल.

११. छपाई खराब असल्याचे आढळून आलेस पुरवठा धारकांस जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही.

१२. दरपत्रकात नमूद दर सर्व करासहित नमूद करावा. तसेच सर्व छपाईचा दर नमूद करावा. साहित्य पोहचविण्याचा वाहतूक खर्च, हमाली अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च पुरवठा धारकांस दिला जाणार नाही.

१३. पुरवठा करण्यात आलेल्या छपाईची प्रत व प्रमाण संबंधित विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झालेखेरीज बील अदा केले जाणार नाही. सदरची छपाई करून श्री संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे पुरवठा करणे आवष्यक आहे.

१४. सदर कामाचे मंजूर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार ०२ टक्के आयकर कपात करणेत येईल.

१५. माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस निविदा धारक जबाबदार राहील.

१६. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठा धारकांस बंधनकारक राहील.

१७. प्रशासकीय व अन्य कारणास्तव दरपत्रके कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखून ठेवलेला आहे.

१८. सदर कामासंबंधी काही वाद उद्भवल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

१९. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठा धारकांस जबाबदार धरणेत येईल व मंजूर निविदा कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

२०. दरपत्रक ज्यांचे नांवे मंजूर होईल, त्यांनी रक्कम रू. १००/- चे स्टॅम्पपेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे (Affidevit) प्रतिज्ञापत्र करून देणे आवष्यक आहे.

------//------

## श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर.
### दरपत्रक फॉर्म

**प्रति,**

**मा.कार्यकारी अधिकारी,**
**श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,**
**पंढरपूर, जि. सोलापूर.**

**विषय - श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर.**
सन २०२३ - दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करणेबाबत.

पुरवठाधारकाचे नांव – श्री - ------------------------------------------------------

पूर्ण पत्ता – - ------------------------------------------------------

------------------------------------------------------

भ्रमणध्वनी – - ------------------------------------------

**महोदय,**

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरच्यावतीने सन २०२३ साठी "दैनंदिनी व दिनदर्शिका (टेबलावरील व भिंतीवरील)" छपाई कामाचे दि.---/----/२०२२ रोजीचे जाहीर दरपत्रकाप्रमाणे सदर कामाचे दरपत्रक सादर करीत आहे.

| अ.क्र. | तपशिल | दर – प्रती नग (सर्व करासह व पोहोच खर्चासह) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | **दैनंदिनी** | |
| २ | **दिनदर्शिका (भिंतीवरील)** | |
| ३ | **दिनदर्शिका (टेबलावरील)** | |

सदर दराने छपाई करून तात्काळ पुरवठा करणेस मी बांधील राहील. तसेच याबाबतच्या आपणांकडून देण्यात आलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्यासंबंधीचे जरूर ते प्रतिज्ञापत्र करून देण्यास मी तयार आहे. तसेच **रू.५०००/-** अनामत रक्कमेचा डीडी/जमा पावतीची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. तरी वरील नमूद दरपत्रकाप्रमाणे सदरच्या छपाईचे काम मला मिळणेस विनंती आहे.

**दि.----/----/२०२२.** **पुरवठाधारकाची सही व शिक्का**

**सोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडलेली आहेत.**

१. अनामत रक्कमेचा डीडी/जमा पावतीची छायांकित प्रत.
२. यापूर्वी सदरची छपाई करून पुरवठा केलेल्या कामाची अनुभवाची प्रमाणपत्रे.
३. स्वत:च्या ओळखपत्राची छायांकित प्रत (पॅनकार्ड, मतदान ओळखपत्र व आधारकार्ड)
४. छपाई कामासाठी आवश्यक असणा-या शासकीय परवान्यांच्या प्रती.
५. शॉप ॲक्ट लायसन्स
६. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.